दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१९५/२०२३

नि.क्र.१० पुढे सुरु

**<u>अर्जदार यांचे तर्फे साक्षीदार क.१ यांचा साक्षीपुरावा</u>**

मी मनिषा राजाराम भगत पाटील शपथेवरती सत्य कथन करते की,

**<u>सरतपास अर्जदार यांचेतर्फे वकील श्री. पी.एस.पाटील यांचेमार्फत :</u>**

०४. माझे सरतपास प्रतिज्ञापत्र नि.१० मधील मजकूर खरा व बरोबर आहे. सदरहू प्रतिज्ञापत्रावरती मी वाचून सही केली होती. मी फेरिस्त निशाणी ३ अनु.क्र.१ वरती माझ्या विवाह नोंदणी प्रमाणपत्राची सही शिक्क्याची प्रत दाखल केलेली आहे. आता मला विवाह नोंदणी प्रमाणपत्र दाखवण्यात आले. हे तेच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदरहू विवाह नोंदणी प्रमाणपत्रास **<u>निशाणी ११</u>** देण्यात येते. तसेच निशाणी ३ अनुक्रमांक २ वरती माझे पती राजाराम गणपती भगत पाटील याचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. आता सदरहू मृत्यू प्रमाणपत्र दाखवले. हे तेच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदरहू मृत्यूपत्र हे सार्वजनिक दस्त असलयाने यांच्या मृत्यूपत्रास अनुक्रमे **<u>निशाणी १२</u>** देण्यात येते. तसेच मी फेरिस्त निशाणी ०९ अनु.क्र.१ वरती दिनांक ११/१०/२०२३ रोजीच्या दै.तरुण भारतमध्ये प्रसिद्ध केलेल्या नोटीसीची प्रत दाखल केली आहे. आता मला सदरहू प्रत दाखवण्यात आली. ही तीच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदरहू नोटीसच्या प्रतीस **<u>निशाणी १३</u>** देण्यात येते. येणेप्रमाणे मला वारसा प्रमाणपत्र मिळावा.

सरतपास संपला.

उलटतपास नाही.

फेरतपास नाही.

निवेदन श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-

**आशिष महिपती चव्हाण**

**४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सांगली.**

**स्थळ - सांगली.**

**दि.२१/११/२०२३.**